पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २३४**

(सभावृत्तांत)

**दिनांक – ०४/०८/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार, दिनांक **०४/०८/२०२१** रोजी **दु.०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा.सभापती, स्थायी समिती यांचे दालनातून मा.सभापती, स्थायी समिती हे मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित केली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य ऑनलाईन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते.

**१. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे – सभापती**

२. मा.कदम शशिकांत गणपत

३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

४. मा.संतोष बबन कांबळे

५. मा.अभिषेक गोविंद बारणे

६. मा,बुर्डे सुवर्णा विकास

७. मा.फुगे भिमाबाई पोपट

८. मा.पोर्णिमा रविंद्र(आप्पा) सोनवणे

९. मा.सुलक्षणा राजू धर

१०. मा.भोईर सुरेश शिवाजी

११. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१२. मा.भालेकर प्रविण महादेव

१३. मा.बनसोडे राजू विश्वनाथ

याशिवाय मा.राजेश पाटील – आयुक्त, मा.विकास ढाकणे – अति.आयुक्त(१), मा.उल्हास जगताप – नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.कुंभोजकर – मुख्य लेखा परिक्षक, मा.राजन पाटिल – शहर अभियंता, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.दुरगुडे, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत. – उप आयुक्त, मा.निकम, मा.भालकर, मा.सवणे – सह शहर अभियंता, मा.जोशी, मा.बोदडे, मा.थोरात, मा.गायकवाड – सहाय्यक आयुक्त, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता वायसीएमएच, मा.मोरे, मा.टकले, मा.देसले – कार्यकारी अभियंता, मा.पानसरे – प्रशासन अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.बहाददरपुरे – समाज विकास अधिकारी, मा.गोफणे – आरोग्य अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.५०) प्रभाग क्र.१७ मधील बिजलीनगर अंडरपासची अनुषंगिक कामे करणेबाबत.

विषय क्र.५१) कोरोना विषाणूचा (कोविड-19) प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी कोविड केअर सेंटर व इन्स्टीट्युशनल कोरंटाइन सेंटर येथील रूग्णांना व नियुक्त कर्मचारी यांना जेवण व नाष्टा उपलब्ध करून देणेबाबत.

विषय क्र.५२) मनपाच्या क्षेत्रात पर्यावरण जनजागृतीकामी आकर्षक वॉल पेंटींग बोर्ड फ्लेक्स बसविणे (माझी बसुंधरा अभियान अंतर्गत)

विषय क्र.५३) कोरोना विषाणू कोविड १९ या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय पिंपरी चिंचवड (आरटीओ) मार्फत नियुक्ती केलेल्या मे.प्रज्ञेश एन्टरप्रायझेस या एजन्सीकडून फिल्ड सर्व्हिलेन्स टिम करिता भाडेत्तवावर घेण्यात आलेल्या वाहनांचे खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.५४) ह क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील नदीपात्रालगतचा अनधिकृत भराव काढून जमिनीची समतल पातळी करणेबाबत.

विषय क्र.५५) सन २०२१-२०२२ या वर्षासाठी वृक्षरोपनाची मोठी रोपे खरेदी करणेबाबत.

विषय क्र.५६) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.९७५५ दि.१६/०६/२०२१ मध्ये दुरूस्तीबाबत. – मा.भिमाबाई फुगे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५७) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन 2021-2022 च्या अंदाजपत्रकातील कामाच्या तरतूदीमध्ये वाढ/ घट करून वर्गीकरण करणेबाबत. – मा.सुवर्णा बुर्डे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५८) ग मुख्यालयातील सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकातील कामांच्या तरतुदी मध्ये वाढ/ घट करणेबाबत. - मा.भिमाबाई फुगे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५९) वाकड प्रभाग क्र.२५ येथे नव्याने विकसित होणा-या विविध रस्त्यांवर विद्युत विषयक कामे करणे करीता विद्युत विभागांतर्गत तरतुद वर्गीकरण करणेबाबत. - मा.भिमाबाई फुगे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६०) मा.स्थायी समिती सभा दि.१४/०७/२०२१ ठराव क्रमांक ९९२४ मध्ये दुरुस्तीबाबत. - मा.भिमाबाई फुगे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६१) नगरभूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांनी मौजे भोसरी (कासारवाडी) येथील स.नं.४०८ पैकी मधील अति तातडी मोजणी फि अदा करणेबाबत. - मा.भिमाबाई फुगे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६२) मा.स्थायी समिती ठराव क्र.९८६४ दि.०७/०७/२०२१ ला दुरुस्ती करणेबाबत. - मा.भिमाबाई फुगे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६३) सत्कारासाठी स्मृतीचिन्हे खरेदी करणेबाबत. - मा.भिमाबाई फुगे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६४) कोविड भत्ता अदा करणेस मान्यता देणेबाबत. - मा.अंबरनाथ कांबळे, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६५) शालेय साहित्य पुरवठयाबाबत. - मा.अंबरनाथ कांबळे, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६६) ठराव क्र ९५०४ दि.१९/०५/२०२१ रोजीच्या ठरावामध्ये दुरुस्ती करणेबाबत. - मा.अंबरनाथ कांबळे, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६७) आण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जम्बो कोविड रुग्णालयाकरिता आवश्यक वैद्यकिय ऑक्सिजन $O_2$ द्रव गॅस पुरवठा करणेबाबत. - मा.अंबरनाथ कांबळे, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६८) सन २०२१-२२ च्या अंदाज पत्रकात नविन विकास कामांना तरतुद वर्गीकरणाबाबत. - मा.अंबरनाथ कांबळे, मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

----------

मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२३३ दि.२८/०७/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – १००३३ विषय क्रमांक – ०१

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/७८७/२०२१, दि.०२/०७/२०२१

विषय - प्रभाग क्र.६ मधील सदगुरुनगर, लांडगेवस्ती व परिसरात पावसाळी गटरची सुधारणा करणेबाबत.

विषय क्र.१ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००३४ विषय क्रमांक – ०२

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बाराणे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/५/कावि/५१९/२०२१, दि.०१/०७/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.Ele/Ho/AZ/44/06/2020-21 अन्वये प्रभाग क्र.१४ आकुर्डी येथील विवेकनगर भागातील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करणे अंतर्गत विद्युत विषयक कामे करणेकामी मे.आर.एन. एंटरप्रायजेस नि.र.रू.42,62,327/- (अक्षरी र.रु.बेचाळीस लाख बासष्ठ हजार तीनशे सत्तावीस फक्त) पेक्षा 25.1% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.31,92,483/- पर्यंत काम करून घेणेस, निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेकरीता मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – १००३५ विषय क्रमांक – ०३

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग – वैद्यकीय मुख्यालय

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/५२७/२०२१, दि.०४/०५/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) नुसार Covid-19 या विषाणूचा प्रादुर्भाव लक्षता घेता, अत्यावश्यक बाब म्हणून मे.स्पर्श हॉस्पिटल यांचे समवेत वेळोवेळी झालेल्या करारनाम्यास व वेळोवेळी दिलेल्या आदेशास अधिन राहून सद्यस्थितीत रुग्णसंख्येची वाढ लक्षात घेता नव्याने १६ आय.सी.यू. व्हेंटीलेटर संख्येपैकी १० बेड हे व्हेंटीलेटर करीता व बाकीचे ६ बेड हे हायफ्लो करीता म्हणजेच ICU विभागातील बेडची संख्या ही ५० वरुन ६६ करण्याकामी येणा-या खर्चास म्हणजेच 16 ICU Beds करीता प्रति बेड प्रति दिवस र.रु.६,४५०/- प्रमाणे र.रु.१,०३,२००/- प्रमाणे तीन महिने कालावधीकरीता र.रु.९२,८८,०००/- (अक्षरी र.रु.ब्याण्णव लाख अठ्ठयाऐंशी हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित असून सदरचे खर्चास तसेच सदर खर्च मध्यवर्ती भांडार विभागाकडील कोरोना निधी या लेखाशिर्षामधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००३६ विषय क्रमांक – ०४

दिनांक – ०४/०८/२०२१

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.सारीका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव-

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.४३ दि.२०/०७/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थीचे हस्ताक्षर सुंदर होणेकरिता "मे.मोरया होलसेल स्टेशनरी कंपनी" यांच्यामार्फत मायमराठी अक्षर लेखन प्रकल्प हे पुस्तक खरेदी करणेबाबत प्रस्ताव कार्यालयास सादर केलेला आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील इ.३ री ते इ. ७ वी तील विद्यार्थांना सुंदर हस्ताक्षर करिता "मे.मोरया होलसेल स्टेशनरी कंपनी" यांच्यामार्फत मायमराठी अक्षर लेखन प्रकल्प हे पुस्तक थेट पद्धतीने खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेची मा.शिक्षण समिती सभेची मागणी असली तरी, प्रस्तुत विषय प्रशासनाने तपासून नियमाधिन कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००३७ विषय क्रमांक – ०५

दिनांक – ०४/०८/२०२१

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.सारीका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव –

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.४४ दि.२०/०७/२०२१ अन्वये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव संपुर्ण देशामध्ये असलेने तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भावामुळे सद्यस्थितीमध्ये सर्व प्राथमिक शाळा बंद आहेत व शालेय शिक्षण ऑनलाईन पध्दतीने सुरु आहेत. सदरचे काळामध्ये शालेय विद्यार्थांनीकरिता (गुडफिल) मे.एस.आर. इन्व्होव्हेटीव्ह प्रा.लि.पिंपरी यांनी कोरोना संसर्गापासून बचाव होण्यासाठी नॉन मेडीसिनल प्रिव्हेंटीव्ह मेजर म्हणून स्टॅण्ड अँण्ड पी अंडरगारमेंटची निर्मीती महिला व शालेय विद्यार्थाकरीता दररोजचे वापराकरीता केलेली आहे. (गुडफिल) जे.एस.आर.इन्व्होव्हेटीव्ह प्रा.लि. या कंपनीचे उत्पादनास जगातील ७५ देशांमध्ये पेटंट असुन या उत्पादनाची विक्री केले जात आहे. गुडफिल उत्पादनाचा उपयोग हा शालेय विद्यार्थांनीना कोरोना काळामध्ये शाळा बंद असल्या तरी त्यांचे घरी राहून अथवा बाहेर असल्यासही त्यापासून संरक्षण मिळणार आहे. (गुडफिल) मे.एस.आर.इन्व्होव्हेटीव्ह प्रा.लि.यांचे गुडफिल उत्पादन हे शालेय विद्यार्थांनीकरीता अतिशय उपयुक्त असलेने सर्व प्राथमिक व माध्यमिक विद्यालयांमधील सर्व शालेय विद्यार्थांनीन करीता सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये या कीटचे वाटप करणेत यावे, गुडफिल कीटमध्ये १ अंडरगारमेंट व २ डबललेअर मास्कचा समावेश असणार आहे. सदरचे कीट हे १ वर्षांचे वॉरंटीसह येत आहे व हे उत्पादन दैनंदिन वापरासाठी योग्य आहे. गुडफिल प्रति कीटची किंमत र.रु.१७९९/- अशी असुन गुडफिल यांचेमार्फत सवलतीच्या दरामध्ये हे कीट किंमत र.रु.१५९९/- प्रति विद्यार्थीनी २ कीट नुसार महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. महानगरपालिका माध्यमिक व प्राथमिक शाळांमध्ये अंदाजे २५००० विद्यार्थांनीना या कीटचा उपयोग होणार आहे. तरी कोरोना काळामध्ये शालेय विद्यार्थांनीकरीता (गुडफिल) मे.एस.आर.इन्व्होव्हेटीव्ह प्रा.लि.पिंपरी यांनी कोरोना संसर्गापासून व बायोसेफ्टी होण्यासाठी शालेय विद्यार्थांनाना उपयोगी कीटचे वाटप करणेकामी यासाठी प्रशासानामार्फत योग्य ती कार्यवाही करणेत येवून शालेय विद्यार्थांनीना गुडफिल कीट वाटप करणेकामी पुढील योग्य ती कार्यवाही करणेस तसेच शिक्षण विभागाकडील सन २०२१-२०२२ या वर्षातील उपलब्ध शिल्लक तरतूदीमधून खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००३८ विषय क्रमांक – ०६

दिनांक – ०४/०८/२०२१

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.सारीका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव –

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.४५ दि.२०/०७/२०२१ अन्वये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव संपुर्ण देशामध्ये असलेने तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भावामुळे सद्यस्थितीमध्ये सर्व प्राथमिक शाळा बंद आहेत व शालेय शिक्षण

ऑनलाईन पध्दतीने सुरु आहेत. सदरचे काळामध्ये विद्यार्थांना शालेय साहित्य देणे आवश्यक असल्याने तथापि नजीकचे काळामध्ये प्राथमिक शाळा ऑनलाईन सुरु असल्याचे शालेय विद्यार्थांना शालेय उपयोगी शैक्षणिक साहित्य गतवर्षाचे पुरवठाधारक यांचेकडून गतवर्षाचे दराने शैक्षणिक साहित्य शालेय वह्यांचे वाटप करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीमध्ये कोरोना साथरोगामुळे शालेय विद्यार्थांना शालेय उपयोगी साहित्यांची आवश्यकता असलेने शालेय साहित्य वाटपाकामी इ.१ ली ते ८ वी मधील सर्व शालेय विद्यार्थांकरीता शालेय वह्या चे पुरवठाधारक मे.सनराज प्रिंटपॅक इंडस्ट्रीज यांचेमार्फत मागील दरानेच शालेय वह्यांचा पुरवठा करणेकामी तसेच शिक्षण विभागाकडील सन २०२१-२०२२ या वर्षातील शालेय वह्या या तरतूदीमधुन येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००३९ विषय क्रमांक – ०७

दिनांक – ०४/०८/२०२१

सुचक – मा.शत्रुध्न काटे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.सारीका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव –

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.४६ दि.२०/०७/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील ग्रंथालयामध्ये विद्यार्थी व शिक्षकांकरिता वाचण्याकरिता पुस्तके खरेदी करणेबाबत मे.साहित्यदर्शन, पुणे यांनी प्रस्ताव कार्यालयास सादर केलेला आहे. सदर संस्थेमार्फत गेली अनेक वर्ष महाराष्ट्रातील नामवंत प्रकाशन संस्थांची चरित्र, आत्मचरित्र, ऐतिहासिक, विज्ञान, पर्यावरण, संगणक, आरोग्य, धार्मिक, स्पर्धा परीक्षा, बालकुमार वाडमय, कथा कादंबऱ्या इत्यादी विषयांची पुस्तके उपलब्ध आहेत. तसेच सदरची पुस्तके मे.साहित्यदर्शन, पुणे यांनी शासकीय, निमशासकीय, शैक्षणिक संस्था, स्वायत संस्था, जिल्हा परिषद, शासनमान्य ग्रंथालय, महानगरपालिका, नगरपालिका यांना पुरवठा करीत आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील ग्रंथालयांमध्ये १२० पुस्तके पुरवठा करण्याचे व सदर कामास र.रु.४,९६,८००/- खर्च कळविला आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील ग्रंथालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी विद्यार्थी व शिक्षकांकरिता अवांतर वाचनासाठी "मे.साहित्यदर्शन, पुणे" यांच्यामार्फत पुस्तके थेट पद्धतीने खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००४०

विषय क्रमांक – ०८

दिनांक – ०४/०८/२०२१

सुचक – मा.अभिषेक बारणे

अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.सारीका सस्ते, मा.तुषार हिंगे यांचा प्रस्ताव –

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.४७ दि.२०/०७/२०२१ अन्वये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव संपूर्ण देशामध्ये असल्याने तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भावाने सद्यस्थितीत सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा बंद आहेत.सद्य स्थितीत कोरोना प्रादुर्भावामुळे ऑनलाईन शिक्षण चालू आहे त्यासाठी विद्यार्थांना शालेय उपयोगी आवश्यक शैक्षणिक साहित्य वाटप करणेकामी शाळांनी मागणी केलेली आहे. तथापि नजिकच्या काळामध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरु होणार असल्याने शालेय विद्यार्थांना शालेय उपयोगी साहित्य नव्याने निविदा न मागविता उपरोक्त नमूद केलेल्या मागील पुरवठादाराकडून सदरचे साहित्य त्यात कोणत्याही प्रकारची दरवाढ न करता मागील वर्षाच्या मंजूर लघुत्तम दराने सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरिता बालवाडी व इ.१ ली ते १० वी च्या विद्यार्थांकारिता शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यास मान्यता देणेबाबत तसेच प्रस्तुत प्रकरणी मागील प्रसिध्द केलेल्या निविदा क्र.५/१ ते ५/१० मधील निविदा क्र.५/१, ५/२, ५/३ निविदा व करारनाम्यातील शर्ती अटी निविदा क्र.५/८ व ५/९ लागू करण्यात आल्या होत्या व आहेत. त्या अनुषंगाने सदर खरेदीस मान्यता देणेबाबत तसेच अद्याप कोरोना सांसर्गिक रोगाचे प्रादुर्भावामुळे शाळा बंद आहेत. दि. १ ऑगस्ट २०२१ रोजी शाळा सुरु होणार असल्याचे प्रस्तावित आहे. शालेय विद्यार्थांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये व विद्यार्थांना वेळेत साहित्य मिळावे यासाठी विद्यार्थाना शालेय वस्तूंचे वाटप करणे आवश्यक आहे. तरी प्रशासनाकडून त्वरित कार्यवाही करण्यात यावी. मूळ निविदेतील सर्व साहित्य इ. १ ली ते ८ वी च्या अंदाजे ४९ हजार विद्यार्थांकरिता शालेय प्रयोगवही, चित्रकलावही, भूगोल नकाशा वही, लेखाशीर्ष सर्वागिक शैक्षणिक गुणवत्ता व विकास वरून तसेच बालवाडी व इ. १ ली ते ७ वी विविध अभ्यासपूरक पुस्तके व इ. बालवाडीची पुस्तके हि इ. १ ली व २ री च्या विद्यार्थांना अधिकची पुस्तके बालवाडीच्या पुस्तकाच्या मंजूर दराने व्यवसायमाला व स्वाध्यायमाला या लेखाशिर्षावरून खरेदी करण्यास व मूळ निविदेतील मान्य दराने माध्यमिक विद्यालयातील इ.५ वी ते १० वी च्या अंदाजे ८८०० विद्यार्थांकारिता चित्रकलावही, प्रयोगवही, भूगोल नकाशा वही व विविध अभ्यासपूरक पुस्तके हि विविध उपक्रम या लेखाशिर्षावरील उपलब्ध तरतूद मधून तसेच प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील इ.५ वी ते १० वी च्या विद्यार्थांना आलेखवही, विविध अभ्यासपूरक पुस्तके निविदेतील गृहपाठमाला इ. ५ वी ते ७ वी च्या गृहपाठमालेच्या पुस्तकाच्या दरात उपलब्ध तरतूदीमधून पुरवठाधारक मे.कौसल्या पब्लिकेशन मार्फत शाळानिहाय शालेय शैक्षणिक साहित्य वाटप करणेकामी नव्याने करारनामा करून पुरवठा आदेश देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००४१ विषय क्रमांक – ०९

दिनांक – ०४/०८/२०२१

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.सारीका सस्ते, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –

मा.शिक्षण समिती सभा ठराव क्र.४८ दि.२०/०७/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेत कोरोना विषाणू विनाश करणारे UVC सयंत्र बसविणेबाबत. या मशीनमध्ये UVC SCANZ हे संयंत्र अल्ट्रावायलेट सी बँड ची प्रखर किरणे उत्सर्ग करून कोणत्याही प्रकारचे जिवाणू बॅक्टेरिया वायरस कोरोना प्रकारचे विषाणू त्याच्या DNA वर परिणाम करून संपूर्ण ९९.९९% विनाश करते. UVC स्कॅनिंग हे संयंत्र पूर्णपणे भारत देशात विकसित केलेले आहे. तसेच त्याची संपूर्ण निर्मिती सेफ लायफस कंपनी (युरोटेक ग्रुप ऑफ कंपनीचा उपविभाग) चा हैदराबाद येथील यांत्रिकी कारखान्यात तयार केले जाते. UVC स्कॅनिंग हे संयंत्र आपणास परिचित अशा एक्स-रे मशीन सारखे काम करते विविध वस्तू, पिशव्या, लॅपटॉप बॅग, डायरी आणि इतर सामान ह्या यंत्रणाच्या पट्ट्यावरून संयंत्रात प्रवेश करून वीस ते तीस सेकंदात बाहेर पडते. त्यावर UVC किरणांचा वर्षाव होऊन वस्तू/सामान ९९.९९% कोरोना मुक्त होऊन बाहेर येते. हे संयंत्र बाहेरून सामान घेऊन आलेल्या व्यक्तीचे सामान संयंत्रातून प्रसार करून कोरोना सारखे संसग्रजन्य रोगाचे विषाणू मुक्त सहज करता येते आणि संपूर्ण वास्तू कोरोना नियंत्रित करता येते. या UVC स्कॅनिंग यंत्रासोबत व्यक्तीची शारीरिक तापमान मोजण्याची व्यवस्था आहे. तसेच कर्मचा-यांची येण्याची वेळ आणि त्यांचे तापमान हे आम्ही क्लाऊड ला जमा करून आपल्या जबाबदार विभागाकडे त्याची नोंद देतो यामुळे कर्मचाऱ्यांचे हजेरी पत्रक देखील तयार होते. युरोप, ब्रिटनमध्ये नवीन कोरोनाच्या भीतीने संपूर्ण जग हादरले आहे. कोरोनाचा नवीन प्रकार जगात पुन्हा उद्भवला तर भविष्यात कोणत्याही जैविक संक्रमणासाठी उपभोगात येईल असे UVC SCANZ मशीन विविध ठिकाणी बसवून जनतेचे सार्वजनिक ठिकाणी व्हायरसचे होणारे संक्रमण नक्कीच रोखू शकतो. सध्या पिंपरी चिंचवड मध्ये नवीन कोरोनाचे ३ रुग्ण मिळाले असून भविष्यातील येणा-या संसर्गाला काही प्रमाणात रोखण्यासाठी या मशीनचा नक्कीच उपयोग होईल. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेत कोरोना विषाणू विनाष करणारे UVC सयंत्र (अमेरिकन संस्था USFDA) तथा WHO NABL मान्यताप्राप्त संस्था VIMTA Lab द्वारा प्रमाणित UVC स्कॅनर M/s.Srias Engineering Pvt.Ltd. (Manufactures UVC Scanz), हैदराबाद तेलंगना मार्फत बसविण्यात तसेच वित्तीय खर्चास मान्यता देणेची मा.शिक्षण समिती सभेची मागणी असली तरी, प्रस्तुत विषय प्रशासनाने तपासून नियमाधिन कार्यवाही करावी प्रथमत: १० मशिन बसविणेस व त्याकामी र.रू.३५,००,०००/- (अक्षरी र.रू.पस्तीस लाख फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००४२ विषय क्रमांक – १०

दिनांक – ०४/०८/२०२१

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.निर्मला गायकवाड, मा.सविता खुळे यांचा प्रस्ताव –

मा.महिला बाल कल्याण समिती सभा ठराव क्र.४० दि.२२/०७/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बाल कल्याण योजने अंतर्गत महिलांच्या विकासासाठी व सक्षमीकरणासाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. यामध्ये महिलांना चार चाकी हलके वाहन (L.M.V) चालविण्याचे (मोटार ड्रायव्हींग) (T.R.) प्रशिक्षण देणे ही योजना वस्तीपातळीवर राबविणेस यापुर्वी ठरावान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड शहरातील महिलांना चार चाकी हलके वाहन (L.M.V.) चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच यापुर्वीच्या यादीतील उर्वरित पात्र लाभार्थ्यांना प्रशिक्षण देणेस व त्याकामी प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेची मा.महिला व बालकल्याण समिती सभेची मागणी असली तरी, प्रस्तुत विषय प्रशासनाने तपासून नियमाधिन कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००४३ विषय क्रमांक – ११

दिनांक – ०४/०८/२०२१

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.सविता खुळे, मा.माधवी राजापूरे यांचा प्रस्ताव –

मा.महिला बाल कल्याण समिती सभा ठराव क्र.४२ दि.२२/०७/२०२१ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बालकल्याण योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील घोषित अघोषित झोपडपट्टीमध्ये वास्तव्यास असलेल्या सर्व महिलांना त्यांचे कुटुंबाच्या नावे असलेला फोटोपास अथवा स्वतःचे आधारकार्ड यापैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य मानून त्या आधारे रोज वापरासाठी शासन दर करातील अनु क्र.९ क प्रमाणे २ चादर व अनु क्र.८ ब प्रमाणे २ बॅरेक कंबल व अनु.क्र.५ अ प्रमाणे २ दरी पंजा व अनु क्र.३ अ प्रमाणे २ बेडशिट संच, २ पिलो कव्हर हा प्रत्येक महिलेस वरील प्रमाणे १ संच (२ चादर, २ कंबल, २ पिलो कव्हर, व २ दरी पंजा व २ दरी बेडशिट) उपलब्ध करून देणेकामी महाराष्ट्र हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, पंतनगर गार्डन व्ह्यू को-ऑप हौसिंग सोसायटी लि.शशांक २२५/५९५ पंतनगर, घाटकोपर (पूर्व) मुंबई – ४०० ०७५ यांचेकडून शासनाच्या दर करारानुसार खरेदी करून उपलब्ध करुन देणेस व त्याकामी सर्व खर्च नागरवस्ती व विकास योजना विभागाकडील २०२१-२२ या अंदाजपत्रकातील पान क्र.३१३ मधील इतर कल्याणकारी योजना मधील उपलेखाशीर्ष अनु.क्र.१४ पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील झोपडपट्टीमध्ये वास्तव्य असलेल्या महिलांना चादर, कंबळ, पंजा आणि बेडशीट व संसारोपयोगी साहित्य देणेबाबत वाढ झाल्यास ३१/०३/२०२२ अखेर पर्यंतच्या कालावधीत सदर योजना राबविणेकामी आवश्यकतेनुसार इतर लेखाशिर्षावरील अखर्चित/शिल्लक रकमे मधून रक्कम नागरवस्ती व विकास योजना विभागातील इतर कल्याणकारी योजना मधील उपलेखाशिर्ष

अनु क्र.१४ पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील झोपडपट्टीमध्ये वास्तव्य असलेल्या महिलांना चादर, कंबळ, पंजा आणि बेडशीट व संसारोपयोगी साहित्य देणेबाबत वेळोवेळी प्राधान्याने वर्ग करणेस अथवा सुधारित अंदाजपत्रकात याकामी आवश्यक तरतूद उपलब्ध करून देण्यास यापुर्वी मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र.१३ दिनांक १५/०१/२०२१ व मा.स्थायी समिती ठराव क्र.८२९१ दिनांक २७/०१/२०२१ नुसार मान्यता देण्यात आली आहे. सदर कामास महानगरपालिका कलम क्र.६६ अन्वये मान्यता देणेत येत आहे. त्यानुसार महिला बालकल्याण विभागामार्फत उपरोक्त संस्थेबरोबर करारनामा करणेस व त्वरित पुरवठा आदेश देणेस येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास तसेच उक्त ठरावामध्ये नमूद केल्याप्रमाणे शासन मान्य दर करारानुसार अनु.क्र.९ क प्रमाणे २ चादर व अनु क्र.८ ब प्रमाणे २ बॅरेक कंबल व अनु.क्र.५ अ प्रमाणे २ दरी पंजा, अनु.क्र.३ अ प्रमाणे ४ बेडशिट संच, ६ पिलो कव्हर सदरचा संच हा प्रत्येक महिलेस वरील प्रमाणे १ संच साहित्य वाटप करण्यासाठी लागणारी तरतूद सन २०२१-२२ च्या महिला व बालकल्याण विभागाच्या सुधारित अंदाजपत्रकामध्ये पान क्र.३१३ महिला व बालकल्याण योजना अंतर्गत उपलब्ध रक्कम व अखर्चित रक्कम या विभागाची अथवा इतर विभागामार्फत उपलब्ध अखर्चित रक्कम अथवा डिसेंबर मधील सुधारित अंदाजपत्रकामध्ये नव्याने मागणी वरून उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच याकामी ४० कोटी रक्कम मा.स्थायी समिती मार्फत उपलब्ध करून मिळावी व सदरचे साहित्य सर्व शहरातील घोषित व अघोषित झोपडपट्टीमधील सर्व महिलांना सदर साहित्याचा लाभ मिळावा तसेच आवश्यकतेनुसार याकामी निधी कमी पडल्यास वेळोवेळी निधी उपलब्ध करून मिळावा तसेच सदरची खरेदी महाराष्ट्र हातमाग सहकारी महासंघ मर्यादित, पंतनगर गार्डन व्ह्यू को-ऑप हौसिंग सोसायटी लि.शशांक २२५/५९५ पंतनगर, घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०० ०७५ यांच्यामार्फत वरील साहित्याची ५० लाखापर्यंत व महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित (महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय) नेरूळ (पश्चिम) नवी मुंबई ४०० ७०६ यांच्यामार्फत वरील साहित्याची ५० लाखाची खरेदी तसेच National Cooperative Consumers Federation of India limited (NCCF) या संस्थेद्वारे वरील साहित्याची उर्वरित रकमेची खरेदी करण्यात यावी. तरी वरील वाटप करण्यात येणा-या संचामध्ये १ दरीपंजा जादा वाढ करण्यात यावी हया उपसूचनेसहित सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला असून ठराव कायम होण्याची वाट न पाहता महिला व बालकल्याण विभागातील प्रशासनाने ठराव कायम होण्याची वाट न पाहता ठरावानुसार त्वरीत कार्यवाही करावी व सन २०२१-२२ साठी प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी मा.आयुक्त यांचेकडे पाठविणेस तसेच वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००४४ विषय क्रमांक – १२

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग – जलशुध्दीकरण केंद्र से.२३

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/जशुके/१४७/२०२१, दि.२२/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या से.२३, निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रासाठी आवश्यक लिक्वीड व पावडर पोली अल्युमिनियम क्लोराईड रसायनांच्या खरेदी करणे'' याकामाचा

आदेश ठेकेदार मे.एस.व्ही.एस केमिकल कार्पोरेशन व मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि. यांना दि.२५/०२/२०२० रोजी देणेत आलेला आहे. कामाची मुळ मुदत १८ महिने म्हणजेच दि.२४/०८/२०२१ पर्यंत आहे. सद्यस्थितीत या विभागाकडे द्रवरुप PAC आणि पावडर PAC चा अनुक्रमे ११९३ मे.टन आणि ३२५ मे.टन एवढा साठा शिल्लक आहे. अस्तित्वात असलेला साठा ३० दिवस पुरेल एवढा आहे. या विभागाकडून द्रवरुप PAC पुरवठा आणि पावडर PAC पुरवठा करणेचे निविदा क्र.०६/०१/ २०१९-२० दि.२५/०२/२०२० अन्वये प्रसिध्द करणेत आलेले आहे. सदर कामासाठी एकुण ३ निविदाधारक प्राप्त झाले आहे. त्यापैकी २ अपात्र आणि १ पात्र निविदाधारक ठरले आहे. सदर कामात स्पर्धा न झालेने द्रवरुप PAC आणि पावडर PAC कामाची फेर निविदा काढणेचा निर्णय या विभागाकडून घेणेत आलेला आहे. येथुन पुढे अल्पवधी कालावधीची फेरनिविदा प्रसिध्द करणे, Prebid करणे, Shortfall टाकणे निविदा उघडणेची कार्यवाही इत्यादी सर्व पध्दतींना साधारणत; एक ते दीड महिना एवढा कालावधी लागु शकतो आणि सद्यस्थितीत पावसाळा ऋतु चालु आहे. त्यामुळे जलशुध्दीकरण केंद्रावर द्रवरुप PAC आणि पावडर PAC ची नितांत आवश्यकता भासणार आहे. निविदा अटी व शर्ती मधील विशेष अट क्र.१९ अन्वये सदर काम पुर्ण झालेनंतर विभागास द्रवरुप PAC आणि पावडर PAC याची आवश्यकता भासलेस Schedule B मधील परिमाणाच्या ५०% अधिक परिमाण मागविता येते तरी या सर्व बाबींना लक्षात घेता याव्यतिरिक्त सद्यस्थितीत चालू असलेला पावसाळा ऋतु मध्ये रसायनांची नितांत गरज लक्षात घेता उपरोक्त विषयांकीत कामातुन Schedule B मधील परिमाणाच्या ५०% अधिक परिमाणाचे द्रवरुप PAC आणि पावडर PAC मागविणे योग्य राहील तसेच या व्यतिरिक्त सदरचे ठेकेदार १% दराने कमी आहेत. याशिवाय म.जि.प्रा. यांच्या नविन दरसुची मध्ये अंदाजे ५% एवढी दरवाढ झालेली आहे. असा सर्व विचार करता उपरोक्त विषयांकीत काम नविन येणा-या कामाच्या ६% एवढे कमी आहे. त्यामुळे मनपाचे नुकसान होणार आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता सदर कामामध्ये Schedule B मधील परिमाणाच्या ५०% अधिक परिमाणाचे म्हणजेच द्रवरुप PAC आणि पावडर PAC मागविणे योग्य राहील व त्याची रक्कम खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | रसायन | टक्केवारी | परिमाण मे.टन | दर | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.एस.व्ही. एस केमिकल कार्पोरेशन | द्रवरुप PAC | ५०% | ८७३ | ९५००.०४ | ८२,९३,५३४.९२ |
| २ | मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि. | द्रवरुप PAC | ५०% | ५८२ | ९५००.०४ | ५५,२९,०२३.२८ |
| ३ | मे.एस.व्ही.एस. केमिकल कार्पोरेशन | पावडर PAC | ५०% | २९१ | २७८१९.०० | ८०,९५,३२९.०० |
| | | | | | एकुण | र.रु.२,१९,१७,८८७/- |

तरी, सदर कामाचा वाढीव खर्च र.रु.२,१९,१७,८८७/- एवढा असुन व सदरील ठेकेदारांना नियमानुसार देय वस्तू व सेवा कर अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००४५ विषय क्रमांक – १३

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.अतिरीक्त आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/१२३७/२०२१, दि.२३/०७/२०२१

मा.अतिरीक्त आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये म्युकर मायकोसिस रुग्णसंख्या वाढत असल्यामुळे मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात म्युकर मायकोसिस संसर्ग झालेल्या बाधित रुग्णांवर वैद्यकिय उपचार केले जातात. त्याकरीता Inj.Amphotericin B 50mg, Tab.Posaconazole 100mg ची तातडीने आवश्यकता असलेने वैद्यकिय विभागाचे मध्यवर्ती औषध भांडार विभागाची मागणी प्राप्त झाली आहे. सदर औषधाचा बाजारात तुटवडा असलेने तसेच सदर औषधे औषधाचे निविदेत समाविष्ट नसलेने उपलब्ध होणेस अडचण निर्माण झाली आहे. सद्यस्थितीत मा.जिल्हाधिकारी, पुणे यांनी सदर टॅबलेट/ इंजेक्शनचे पुरवठ्या करीता वेळोवेळी आदेश पारीत करुन Tablet/ Vials च्या संख्येसह पुरवठाधारकांना निश्चित करुन दिले होते. त्याप्रमाणे मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालया करीता मे.सारिका एंटरप्राईजेस यांचेकडुन Tab.Posaconazole 100mg र.रु.588/- प्रति टॅबलेट ( सर्व करासहीत) या दराने 200 टॅबलेट करीता एकुण र.रु.1,17,600/- ची खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच मे.अरिहंत केमीस्ट एलएलपी यांचेकडुन inj.Amphotericin B 50mg (Liposomal) र.रु.5987.39 या दराने एकुण 50 Vials थेट पध्दतीने एकुण र.रु.2,99,370/- ची खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच मे.एम.एम.फार्मा. चिंचवड यांचेकडुन inj. Amphotericin B 50mg (Liposomal) र.रु.5,987/- या दराने एकुण 200 Vials थेट पध्दतीने एकुण र.रु.11,97,440/- ची खरेदी करण्यात आलेली आहे. असे म्युकर मायकोसिस आजारावरील औषधे एकुण र.रु.16,14,410/- ची खरेदी करण्यात आली आहे. सदरचे खर्चास भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना दिनांक १३/०३/२०२० व १४/०३/२०२० व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधिल कलम ४१ व ५०, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३ (६) व कलम ६७ (३) (क) तसेच महापालिका अधिनियम अनुसुची प्रकरण ५(२)(२) नुसार सदर पुरवठाधारकाकडुन थेट पध्दतीने करारनामा न करता खरेदीकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००४६ विषय क्रमांक – १४

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– मध्य.सा.भांडार,वैद्यकिय

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.अतिरीक्त आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/०५/कावि/८६६/२०२१, दि.२३/०७/२०२१

विषय – कोविड १९ रॅपिड अन्टीजन टेस्ट किट्स खरेदीबाबत.

विषय क्र.१४ चा विचार दि.१८/०८/२०२१ चे सभेचे वेळी घेणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००४७ विषय क्रमांक – १५
दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– पाणीपुरवठा
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.अतिरीक्त आयुक्त(१) यांचे पत्र क्र.पापु/०६/कावि/२०८/२०२१, दि.२२/०७/२०२१

मा.अतिरीक्त आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.1/1/2020-2021 अन्वये रावेत, अशुध्द जलउपसा केंद्र येथिल सन २०२०-२१ या कालवधीकरिता पवना नदीमधील व इनटेक चॅनेल मधील गाळ कचरा काढणेकामी मे.महाराष्ट्र अंडर वॉटर सर्व्हीसेस नि.र.रू.56,30,720/- (अक्षरी र.रु. छपन्न लाख तीस हजार सातशे वीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.56,30,720/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.56,30,720/- पेक्षा 18% कमी म्हणजेच र.रु.46,17,190/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.46,17,190/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००४८ विषय क्रमांक – १६
दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– पाणीपुरवठा
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.अतिरीक्त आयुक्त(१) यांचे पत्र क्र.पापु/०६/कावि/२०९/२०२१, दि.२२/०७/२०२१

मा.अतिरीक्त आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.01/03/2021-2022 अन्वये मनपाच्या गणेशनगर थेरगाव पंप हाऊस येथील पंपाची क्षमता वाढविणे तसेच अतिरिक्त पंप बसिवणेकामी मे.फलोमॅक इंजिनिअरिंग कॉपोरेशन नि.र.रू.77,69,166/- (अक्षरी र.रु.सत्याहत्तर लाख एकोणसत्तर हजार एकशे सहासष्ठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.77,69,166/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.77,69,166/- पेक्षा 15.6% कमी म्हणजेच र.रु.65,57,176 /- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.65,57,176/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००४९ विषय क्रमांक – १७

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– पाणीपुरवठा

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.पापु/०६/कावि/२०७/२०२१, दि.२२/०७/२०२१

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.1/2/2020-2021 अन्वये अशुध्द जलउपसा केंद्र रावेत येथिल सन २०२०-२१ या कालावधीकरिता टप्पा क्र १ ते ४ संपमधील गाळ काढणेकामी मे.महाराष्ट्र अंडर वॉटर सर्व्हीसेस नि.र.रू.34,18,800/- (अक्षरी र.रु.चौतीस लाख अठरा हजार आठशे फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.34,18,800/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.34,18,800/- पेक्षा 18% कमी म्हणजेच र.रु.28,03,416/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.28,03,416/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००५० विषय क्रमांक – १८

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– विद्युत मुख्यालय

सुचक – मा.शत्रुध्न काटे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.अतिरीक्त आयुक्त(१) यांचे पत्र क्र.विमुका/०८/कावि/३५४/२०२१, दि.२२/०७/२०२१

मा.अतिरीक्त आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा क्र.३४/८-२०२०-२१ प्रभाग क्र.१६ मधील रावेत भागातील रावेत गावठाण ते समीर लॉन्स पर्यंत १८ मी. डी.पी. रस्ता व इतर रस्ते विकसित करणेकामी मे.यश इलेक्ट्रोलाईन नि.र.रू.१,६८,२९,७६४/-(अक्षरी र.रू.एक कोटी अडुसष्ट लाख एकोणतीस हजार सातशे चौसष्ट फक्त) पेक्षा २१.१७% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००५१ विषय क्रमांक – १९

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– उद्यान/वृक्षसंवर्धन

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संकोष कांबळे

संदर्भ - मा.उप.आयुक्त(उद्यान विभाग)यांचे पत्रक्र.उद्यान/०४/कावि/३९६/२०२१, दि.२३/०७/२०२१

विषय - मनपाचे जाधववाडी परीसरातील प्रभाग क्र.२ मधील विविध रस्ते मध्यदुभाजक सुशोभिकरण करणे व २ वर्षे देखभाल करणेबाबत.

विषय क्र.१९ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००५२ विषय क्रमांक – २०

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– ह क्षेत्रीय स्थापत्य

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.हक्षेका/स्था/१८१/२०२१, दि.०१/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महापालिकेतील प्रभाग क्र.३० दापोडी मधील शितळादेवी चौक स.नं.६ ते मुस्लीम दफनभूमी स.नं.१५ पर्यंतचा रस्ता अद्यावत पध्दतीने विकसित करणे (टप्पा-२) साठी मा.नगरसदस्य यांची मागणी आहे. सबब, सदर कामास प्रकल्प सल्लागार म्हणून मे.नेक्सस टेकनो कंन्सलटंट यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर कामांसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून करावयाच्या कामाच्या व्याप्तीमध्ये प्रस्तुत कामांचे पुर्वगणक पत्र तयार करणे व निविदा बनविणे तसेच कामांवर देखरेख करणे इ. निविदापुर्व (Pre tender activity) व निविदा पश्र्चात (post tender activity) कामे करावी लागणार आहेत. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत प्रकल्प सल्लागार यांची दरसूची दि.०६/०४/२०२१ ते दि.१२/०४/२०२१ रोजी मागविण्यात आल्या आहेत. प्रस्तावात नमूद प्रमाणे मे.नेक्सस टेकनो कंन्सलटंट यांना १.९६% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये विविध प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार म्हणुन मे.नेक्सस टेकनो कंन्सलटंट यांची नियुक्ती केलेली आहे. तसेच मा. सह शहर अभियंता यांनी सदर नेमणूकीबाबत दि.०५/०४/२०२१ च्या प्रस्तावाद्वारे मंजूरी देण्यात आलेली आहे. उपरोक्त बाबींचा विचार करता प्रस्तावात नमुद कामासाठी मे.नेक्सस टेकनो कंन्सलटंट यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेचा प्रस्ताव निविदापुर्व ०.५०% (Pre tender activity) व निविदा पश्र्चात १.४६%(post tender activity) कामांसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व प्रकल्प खर्चाच्या १.९६% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००५३ विषय क्रमांक – २१

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/८१९/२०२१, दि.२३/०७/२०२१

विषय - कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम समोरील इमारतीमध्ये मे.कोर्टासाठी फर्निचर व इतर स्थापत्य विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.२१ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००५४ विषय क्रमांक – २२

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– लेखा

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/२६/कावि/३२/२०२१, दि.२६/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे शहर विकासाच्या अनुषंगाने विविध प्रकल्पातंर्गत नदी सुधार प्रकल्प करण्याचे नियोजित आहेत. त्याअंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील पवना व इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प करण्यात येणार आहे. त्याप्रमाणे सदर प्रकल्प उभारण्यासाठी मोठयाप्रमाणावर निधी उपलब्ध करावा लागणार आहे. यासाठी महापालिका कर्ज/कर्जरोखे या बाबींचा विचार करीत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सुरुवातीला अंदाजे र.रु.200 कोटी एवढा निधी कर्ज/कर्जरोखे स्वरुपात उभारणीचा मानस असून पुढील कालावधीत आवश्यकते प्रमाणे निधी उभारण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने महापालिकेने कर्ज/कर्जरोख्यांसाठी सन 2021-22 च्या अर्थसंकल्पामध्ये मा. महापालिका सभा ठराव क्र.632, दि.31/03/2021 अन्वये "महापालिका भांडवली प्रकल्पांसाठी कजरोखे उभारणे" या लेखाशिर्षाखाली 400 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. सदरचे कर्ज/कर्जरोखे उभारण्याचे कामकाज पूर्णपणे एस बी आय कॅपिटल मार्केट लिमिटेड यांचेकडील प्राप्त मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने खालिल प्रमाणे करण्यात येणार आहे. महापालिकेच्या विकास कामांसाठी कर्ज/कर्जरोखे उभारण्यासाठी काही संस्थांची नेमणूक करणे आवश्यक आहे. यामध्ये मर्चंट बँकर, क्रेडीट रेटींगसंस्था, डीबेंचर ट्रस्टी, रेजीस्ट्रार, लीगल कौंसिल, डीपॉझीटर, स्टॉक एक्स्चेंज, बँकर इ. संस्थांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सद्यस्थितीमध्ये या संस्थापैकी मर्चंट बँकर म्हणून एस बी आय कॅपिटल मार्केट लिमिटेड व क्रेडीट रेटींगसाठी मे. क्रिसिल क्रेडीट रेटींग व मे. केअर क्रेडीट रेटींग यांची मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे एस बी आय कॅपिटल मार्केट लिमिटेड यांचेकडील प्राप्त सूचनेनुसार कर्ज/कर्जरोखे कामकाज सुव्यवस्थितपणे करणे, त्यातील कायदेशीर बाबींची पडताळणी करणे तसेच इतर कामकाज करणेकामी लीगल कौंसिलर, रेजीस्ट्रार व डीबेंचर ट्रस्टीची नेमणूक करणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. प्राप्त सूचनेच्या अनुषंगाने महापालिका कर्ज/कर्जरोखे उभारणेच्या कामकाजाचा अनुभव असलेल्या संस्थांकडून दर मागविण्यात आलेले आहेत. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | मध्यस्थसंस्था | संस्थेचे नाव | शुल्क/फी | संबंधित संस्थानी कामकाज केलेल्या महापालिकांचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1. | Debenture Trustee | SBICAP Trustee Company Limited | **सुरक्षित बॉंडः**<br>स्वीकृती फी–रु.75,000/-<br>ट्रस्ट सेटलमेंट – रु. 1000/-<br>CERSAI फी– रु.5000/-<br>वार्षिक शुल्क- रु.1,15,000/-रोखेंची पूर्तता होईपर्यंत)<br>**असुरक्षित रोखेः**<br>स्वीकृती फी- रु.60,000/-<br>ट्रस्ट सेटलमेंट–रु.1000/-<br>CERSAI फी- लागू नाही<br>वार्षिक फी- रु.75,000/-(रोखेची पूर्तता होईपर्यंत) | • पुणे महानगरपालिका<br>• नवी दिल्ली महानगरपालिका<br>• ग्रेटर विशाखापट्टणम महानगरपालिका<br>• हैदराबाद बृहत्तर हैदराबाद महानगरपालिका<br>• सुरत महानगरपालिका<br>• अहमदाबाद महानगरपालिका<br>• राजकोट महानगरपालिका<br>• नगर निगम गाझियाबाद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2. | Registrar | KFintech | **इलेक्ट्रॉनिक कनेक्टिव्हिटी:**<br>प्रति डिपॉझिटरी प्रति ISIN रु.2500/-<br>**बाँडमुद्दा:**<br>रू.50,000/-प्रति ISIN ठोक रक्कम<br>फोलिओ देखभाल शुल्क:<br>प्रति ISIN रु.1000/-<br>**व्याज प्रक्रिया फी:**<br>प्रति ISIN प्रति व्याज चक्र रू.2500/-<br>(इतर करलागू) | • पुणे महानगरपालिका<br>• लखनऊ महानगरपालिका<br>• इंदूर महानगरपालिका<br>• हैदराबाद बृहत्तर हैदराबाद महानगरपालिका<br>• ग्रेटर विशाखापट्टणम महानगरपालिका<br>• गाझियाबाद महानगरपालिका<br>• सुरत महानगरपालिका<br>• अहमदाबाद महानगरपालिका<br>• भोपाळ महानगरपालिका<br>• वडोदरा महानगरपालिका |
| 3. | Legal Councel/ कायदेशीर सल्ला | M.V. Kini Law Firm | र.रु.7,50,000/-<br>सेबीकडे प्राथमिक प्लेसमेंट मेमोरँडम भरल्यानंतर 50% देय; पूर्ण होण्याच्या टप्प्यावर 50% देय. (जीएसटी अतिरिक्त) | • ग्रेटर हैदराबाद महानगरपालिका<br>• इंदूर महानगरपालिका<br>•ग्रेटर विशाखापट्टणम महानगरपालिका<br>• भोपाळ महानगरपालिका<br>• अहमदाबाद महानगरपालिका<br>• सुरत महानगरपालिका<br>• गाझियाबाद नगरनिगम |

उपरोक्त नमूद तपशिला प्रमाणे मे.SBICAP Trustee Company Limited, मे.KFintech व M.V. Kini Law Firm या मध्यस्थ संस्थानी त्यांचे कामकाजाचे अनुषंगाने देय फीचे दर सादर केले आहे. त्यानुसार महापालिकेचे कर्ज/कर्जरोखे उभारणेकामी सदर संस्थाची थेट पध्दतीने नियुक्ती करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००५५ विषय क्रमांक – २३

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– ड क्षेत्रीय स्थापत्य

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ - मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.डक्षे/स्था/कावि/५८७/२०२१, दि.१२/०७/२०२१

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

ड क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील स्थापत्य विभागाअंतर्गत प्रभाग क्र.२६ पिंपळे निलख येथील खालील नमुद विकास कामे करणेसाठी निविदा पुर्व व निविदा पश्र्चात प्रकल्प सल्लागार नेमणूक करणेसाठी अशा प्रकारचे काम करणा-या व पिंपरी चिंचवड मधील नोंदणीकृत प्रकल्प सल्लागार यांचेकडून दि.१४/०५/२०२१ ते दि.२१/०५/२०२१ चे कालावधी ई-कोटेशन नोटीस क्र.DZone/460 2021-22, दि.14/05/2021 अन्वये सीलबंद दरपत्रक मागविणेत आले होते. प्राप्त सल्लागारांची सूची तयार करून तुलनात्मक दर काढले असता खालील सल्लागारांचे दर/ फी लघुत्तम आहेत त्यास अनुसरून खालील प्रमाणे कामांना सल्लागार नेमणुक करणेकामी मंजुरी आवश्यक आहे.

| अनु क्र. | कामाचे नाव | लघुत्तम सल्लागाराचे नाव | कोटेशन सल्लागार फी / प्राप्त दर |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२६ वाकड-पिंपळे निलख येथील वेणूनगर व गेणूभाऊ कलाटेनगर मध्ये क्रॉकीटीकरणाने रस्ते विकसीत करणे. | M/s. SWARAJ ENGINEERING CONSULTANCY | 1.73% |
| २ | प्रभाग क्र.२६ पिंपळे निलख येथील छत्रपती चौक ते मानकर चौकापर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | M/s.PAVE - TECH CONSULTANTS | 1.85% |

तरी सदर तक्त्यामधील नमूद केलेल्या प्रकल्पांना प्रकल्प सल्लागार म्हणून सल्लागार नेमणेकामी व त्यांना अदा करावयाच्या फी च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००५६ विषय क्रमांक – २४
दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– क क्षेत्रीय पाणीपुरवठा
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ - मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.कक्षेका/पापु/११/कावि/४४७/२०२१, दि.२६/०७/२०२१

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सन २०१८–१९ करिता नेहरूनगर परिक्षेत्रातील पाण्यच्या टाक्यांचे परिचालन करणे व किरकोळ दुरूस्तीची कामे करणेकामी मे.शुभम उद्योग निविदा क्र.१९/०६/२०१८-१९ करत असून कामाची मुळ प्रशासकिय मान्यता र.रु.२,५०,००,०००/- एवढी आहे. सदर कामास र.रु.१,७५,२१,८९७/- या सुधारित खर्चास मा.स्थायी समिती ठराव क्र.८६०० दि.२६/०२/२०२१ मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर काम १००% पूर्ण झालेले आहे. अशा प्रकारच्या कामाची निविदा प्रक्रिया जानेवारी २०२० मध्ये राबवलेली असून पुढील कार्यवाही चालू असताना या दरम्यान कोरोना विषाणूच्या (Covid-19) साथीच्या रोगामुळे संपूर्ण भारत देशात Lockdown घोषित झाल्यामुळे व तांत्रिक अडचण असल्यामुळे पुढील निविदा कार्यवाही थांबलेली होती. त्यामुळे सदर कामास मा.स्थायी समितीची र.रू.१,७५,२१,८९७/- चे खर्चास सुधारित मान्यता घेणेत आली आहे. तथापि नविन कामाची निविदा काढलेली असुन पुढील कार्यवाही चालू आहे. तोपर्यंत सद्यस्थितीत चालू असलेल्या कामामधून पाणीपुरवठा सुरळीत चालू ठेवणेकामी अंतर्गत वाढ घट करून सुधारित मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कामासाठी वाढीव खर्च र.रु.२५,००,०००/- इतकी येत आहे. अशा प्रकारे मूळ खर्चाच्या मान्यतेची र.रु.१,७५,२१,८९७/- गृहीत धरून येणाऱ्या एकत्रित सुधारीत अंदाजपत्रकीय खर्च र.रु.२,००,२१,८९७/- इतका होणार आहे. सदर निविदेचा दर २५.०१% ने कमी असल्याने त्या दराने काम करणेस मे.शुभम उद्योग तयार असल्याने मनपाचे खर्चात बचत होणार आहे. सबब या कामासाठी येणा-या वाढीव खर्चास व अंतर्गत वाढ घट करून सुधारित अंदाजपत्रकीय रकमेच्या प्रस्तावात नमूद प्रमाणे येणारा वाढीव खर्च र.रु.२५,००,०००/- व अंतर्गत वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२५,००,०००/-**)**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००५७ विषय क्रमांक – २५

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– क क्षेत्रीय पाणीपुरवठा

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ - मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.कक्षेका/पापु/११/कावि/४४९/२०२१, दि.२६/०७/२०२१

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सन २०१८–१९ करिता पांजरपोळ परिसरात पाण्यच्या टाक्यांचे परिचालन करणे व किरकोळ दुरूस्तीची कामे करणेकामी मे.श्री.बापदेव महाराज स्वंयम रोजगार सेवा संस्था सह.संस्था मर्या.” निविदा क्र.१९/१४/२०१८-१९ करत असून कामाचीमुळ प्रशासकिय मान्यता र.रु.१,५०,००,०००/- एवढी आहे. सदर कामास र.रु.१,००,०६,५४३/- या सुधारित खर्चास मा.स्थायी समिती ठराव क्र.८२३१ दि.२७/०१/२०२१ व ठराव क्र.८६०२ दि.२६/०२/२०२१ मान्यता घेण्यात आलेली आहे.सदर काम १००% पूर्ण झालेले आहे. अशा प्रकारच्या कामाची निविदा प्रक्रिया जानेवारी २०२० मध्ये राबवलेली असून पुढील कार्यवाही चालू असताना या दरम्यान कोरोना विषाणूच्या (Covid-19) साथीच्या रोगामुळे संपूर्ण भारत देशात Lockdown घोषित झाल्यामुळे व तांत्रिक अडचण असल्यामुळे पुढील निविदा कार्यवाही थांबलेली होती. त्यामुळे सदर कामास मा.स्थायी समितीची र.रू.१,००,०६,५४३/- चे खर्चास सुधारित मान्यता घेणेत आली आहे. तथापि नविन कामाची निविदा काढलेली असुन पुढील कार्यवाही चालू आहे. तोपर्यंत सद्यस्थितीत चालू असलेल्या सदर कामामधून पाणीपुरवठा सुरळीत चालू ठेवणेकामी अंतर्गत वाढ घट करून सुधारित मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कामासाठी वाढीव खर्च र.रु.१३,००,०००/- इतकी येत आहे. अशा प्रकारे मूळ खर्चाच्या मान्यतेची र.रु.१,००,०६,५४३/- गृहीत धरून येणाऱ्या एकत्रित सुधारीत अंदाजपत्रकीय खर्च र.रु.१,१३,०६,५४३/- इतका होणार आहे सदर निविदेचा दर २७.००% ने कमी असल्याने त्या दराने काम करणेस मे.बापदेव महाराज स्वंयम रोजगार सेवा संस्था सह.संस्था मर्या. तयार असल्याने मनपाचे खर्चात बचत होणार आहे. सबब या कामासाठी येणा-या वाढीव खर्चास व अंतर्गत वाढ घट करून सुधारित अंदाजपत्रकीय रकमेच्या प्रस्तावात नमूद प्रमाणे येणारा वाढीव खर्च र.रु.१३,००,०००/- व अंतर्गत वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू. र.रु.१३,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००५८ विषय क्रमांक – २६

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– क क्षेत्रीय पाणीपुरवठा

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ - मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.कक्षेका/पापु/११/कावि/४४८/२०२१, दि.२६/०७/२०२१

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सन २०१८–१९ करिता अजमेरा टाकी परिक्षेत्रातील पाण्यच्या टाक्यांचे परिचालन करणे व किरकोळ दुरूस्तीची कामे करणेकामी मे.समिप सर्व्हीसेस निविदा क्र. १९/१९/२०१८-१९ करत असून याकामाची मुळ प्रशासकिय मान्यता र.रु.१,००,००,०००/- एवढी आहे. सदर कामास र.रु.६२,४९,९९४/- या सुधारीत खर्चास मा.स्थायी समिती ठराव क्र.८६०१ दि.२६/०२/२०२१ मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर काम १००% पूर्ण झालेले आहे. अशा

प्रकारच्या कामाची निविदा प्रक्रिया जानेवारी २०२० मध्ये राबवलेली असून पुढील कार्यवाही चालू असताना या दरम्यान कोरोना विषाणूच्या (Covid-19) साथीच्या रोगामुळे संपूर्ण भारत देशात Lockdown घोषित झाल्यामुळे व तांत्रिक अडचण असल्यामुळे पुढील निविदा कार्यवाही थांबलेली होती. त्यामुळे सदर कामास मा.स्थायी समितीची र.रू.६२,४९,९९४/- चे खर्चास सुधारित मान्यता घेणेत आली आहे. तथापि नविन कामाची निविदा काढलेली असुन पुढील कार्यवाही चालू आहे. तोपर्यंत सद्यस्थितीत चालू असलेल्या सदर कामामधून पाणीपुरवठा सुरळीत चालू ठेवणेकामी अंतर्गत वाढ घट करून सुधारित मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर कामासाठी वाढीव खर्च र.रु.१५,००,०००/- इतकी येत आहे. अशाप्रकारे मूळ खर्चाच्या मान्यतेची र.रु.६२,४९,९९४/- गृहीत धरून येणाऱा एकत्रित सुधारीत अंदाजपत्रकीय खर्च र.रु.७७,४९,९९४/- इतका होणार आहे. सदर निविदेचा दर २७.०१% ने कमी असल्याने त्या दराने काम करणेस मे. समिप सर्व्हीसेस तयार असल्याने मनपाचे खर्चात बचत होणार आहे. सबब या कामासाठी येणाऱ्या वाढीव खर्चास व अंतर्गत वाढ घट करून सुधारीत अंदाजपत्रकीय रकमेच्या प्रस्तावात नमूद सदर कामासाठी येणारा वाढीव खर्च र.रु.१५,००,०००/- व अंतर्गत वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू. र.रु.१५,००,०००/- )

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००५९ | विषय क्रमांक – २७

दिनांक – ०४/०८/२०२१ | विभाग– झोनिपु स्थापत्य

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे | अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ - मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२७०/२०२१, दि.२६/०७/२०२१

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.०३/०१-२०२१-२२ अन्वये सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र.१३ ओटास्किम येथील विविध झोपडपट्टयामधील अंतर्गत गल्ल्यामध्ये स्ट्रॉर्म वॉटर व इतर स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणेकामी मे.एच.डी.असोसिएट्स नि.र.रु.७४,९४,८६७/- (अक्षरी र.रु.चौ-याहत्तर लाख चौ-यान्नव हजार आठशे सदुसष्ठ फक्त) मधून रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळुन र.रू.७४,७८,२६७/- वर निविदा मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रू.७४,७८,२६७/- पेक्षा २९.९९९% कमी म्हणजेच र.रु.५२,३४,८६२/-+रॉयल्टी चार्जेस र.रु.५,१९०/- मटेरीयल टेस्टींग चार्जेस र.रु.१६,६००/- = एकुण र.रु.५२,५६,६५२/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा कऱणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस,भाववाढ कलमामुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेस करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००६०	विषय क्रमांक – २८
दिनांक – ०४/०८/२०२१	विभाग– झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.शशिकांत कदम	अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे
संदर्भ - मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२७१/२०२१,दि.२७/०७/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.०५/११-२०२०-२१ मधील अ.क्र.१० अन्वये प्रभाग क्र.१३ सेक्टर क्र.२२ निगडी येथील बुध्दनगर, विलासनगर व सभोवतालच्या परिसरातील गटर पाथवे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.एस.व्ही.सातपुते डेव्हलपर्स अँन्ड बिल्डर्स नि.र.रु.३२,४२,८३३/- (अक्षरी र.रु.बत्तीस लाख बेचाळीस हजार आठशे तेहतीस फक्त) मधून रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळुन र.रू.३१,७७,८३३/- वर निविदा मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रू.३१,७७,८३३/- पेक्षा २५.६५०% कमी म्हणजेच र.रु.२३,६२,७१९/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.७७१३६/- मटेरीयल टेस्टींग चार्जेस र.रु.६५,०००/- = एकुण र.रु.२५,०४,८५५/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस,भाववाढ कलमामुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००६१	विषय क्रमांक – २९
दिनांक – ०४/०८/२०२१	विभाग– विद्युत मुख्य
सुचक – मा.भिमाबाई फुगे	अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे
संदर्भ - मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.विमुका/०४/कावि/८११/२०२१,दि.२३/०७/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील सोबतचे प्रपत्र "अ" मधील (1 ते 30) निविदा कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असून मंजूर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करण्यात येत आहेत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००६२	विषय क्रमांक – ३०
दिनांक – ०४/०८/२०२१	विभाग– स्थापत्य ह मुख्यालय
सुचक – मा.संतोष कांबळे	अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ - मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/८३१/२०२१, दि.२७/०७/२०२१

मा. कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभाग ह मुख्यालयाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (1 ते 18)

मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करण्यात येत आहेत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००६३ विषय क्रमांक – ३१

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ - मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/८३०/२०२१, दि.२७/०७/२०२१

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभाग क मुख्यालयाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ (1 ते 8) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करण्यात येत आहेत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००६४ विषय क्रमांक – ३२

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– स्थापत्य ह मुख्यालय

सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ - मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/८३३/२०२१, दि.२८/०७/२०२१

विषय - प्रभाग क्र.३२ मधील विविध ठिकाणी स्थापत्य विषयक व इतर अनुषंगिक कामे करणेबाबत.

विषय क्र.३२ चा विचार दि.१८/०८/२०२१ चे सभेचे वेळी घेणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००६५ विषय क्रमांक – ३३

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– स्थापत्य ह मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ - मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/८३२/२०२१, दि.२८/०७/२०२१

मा.अति.आयुक्त(१)यांनी शिफारस केले प्रमाणे –

मे.अरबाझ इंजिनिअरिंग अँड सिव्हील कन्स्ट्रक्शन यांचेकडून र.रू.4,36,016/- + 18% GST ची र.रू.80,086/- + TDS र.रु.8898/- अशी एकूण र.रू.5,25,000/- एवढी रक्कम मनपा कोषागारात भरून घेऊन प्रभाग क्र.२० कासारवाडी येथील मनपाची माध्यमिक शाळा इमारत (भाग-१) पाडून, या इमारतीमधून प्राप्त होणारे राडा-रोडा, स्ट्रक्चरल स्टील, लोखंड, दरवाजा, खिडक्या, क्रॉक्रीट, वीटा, फरशी, लोखंडी ग्रील, लोखंडी रेलींग, पत्रे, लाकूड, विद्युत वायरींग, विद्युत बटणे व इतर न काढता येणारे साहित्य, इमारत पाडणा-या ठेकेदार मे.अरबाझ इंजिनिअरिंग अँड सिव्हील कन्स्ट्रक्शन यांना निविदेच्या विहित अटीनुसार इमारत पाडून, या इमारतीमधील साहित्य देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – १००६६ विषय क्रमांक – ३४

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– स्थापत्य इ मुख्यालय

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ - मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/४२३/२०२१, दि.२७/०७/२०२१

मा.अति.आयुक्त(१)यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.04/10/2021-22 अन्वये दिघी-बोपखेल प्रभाग क्र.४ येथील बोपखेल रामनगर ते बोपखेल गावठाण रस्त्यास फुटपाथ व दुभाजक करणेकामी मे.बी.पी.खोडदे अँण्ड कं. नि.र.रू.81,68,313/- (अक्षरी र.रू. एक्याऐंशी लाख अडूसष्ठ हजार तीनशे तेरा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.81,56,614/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.81,56,614/- पेक्षा 32.50% कमी म्हणजेच र.रु.55,05,714/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.13,993/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.11,700/- = एकुण र.रु.55,31,407/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००६७ विषय क्रमांक – ३५

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– बी.आर.टी.एस.स्थापत्य

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बी.आर.टी.एस/८९७/२०२१, दि.२७/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहर विकसित होत असताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून औद्योगिक शहर म्हणून नावारूपास आलेले आहे. शहरात होत असलेले नागरीकरण व शहराचा होणारा विस्तार लक्षात घेऊन शहरामध्ये जागतिक स्तरावरच्या पायाभूत सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. या सुविधा उभारत असताना समाजातील सर्व घटकांना त्याचा वापर करता येईल व विना-अडथळा प्रवास करता येईल अशा प्रकारच्या (Universal Accessibility) पायाभूत सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. प्रामुख्याने सार्वजनिक वाहतूक व मोटर विरहित वाहतूक (NMT) यांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने रस्त्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. जगभरामध्ये सार्वजनिक वाहतूक व विना मोटर वाहतूक (NMT) जसे की सायकल व पायी चालणे यांसाठी सुविधा पुरविण्यावर भर देण्यात येत आहे. त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवड शहरातील निगडी ते दापोडी या प्रमुख रस्त्याचे नुतनीकरण करणे आवश्यक आहेत. सदरच्या कामाच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने निगडी-दापोडी या रस्त्याचे सार्वजनिक वाहतुक, मोटर विरहित वाहतुक यांचे Universal Accessibility चे अनुषंगाने नुतनीकरन करणे व सुशोभिकरण करणे कामासाठी Expression of Interest (EOI) मागविण्यात आल्या होत्या. सदरच्या कामामध्ये दापोडी ते निगडी या रस्त्यावर सदरची कामे करणेचे नमुद करण्यात आले होते. या नमूद कामे

करण्यासाठी १२ किलोमीटर लांबीच्या रस्त्याची दोन भागांमध्ये विभागणी करून (भाग १ - डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी ते हॅरिस ब्रिज दापोडी व भाग २ - डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी ते भक्ती शक्ती चौक निगडी) या कामाचा समावेश महापालिका अंदाजपत्रक सन २०२१- २२ मध्ये करण्यात आलेला आहे. प्रत्येक भागासाठी र.रू.५० कोटीची प्रशासकीय मान्यता मा.महापालिकासभेमार्फत ठराव क्र.६३२ दि.३१/०३/२०२१ अन्वये मिळालेली आहे. सदर अभिव्यक्ती स्वास्थ निविदा (Expression of Interest) मध्ये २ संस्थांनी / सल्लागारांनी सहभाग नोंदविला होता. १) प्रसन्न देसाई आर्किटेक्ट ॲण्ड अर्बन डिझाईनर सह मॅप्स ग्लोबल सिव्हिलटेक प्रा. लि. २) युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि. या दोन्ही संस्थांनी दि. २१/०६/२०२१ रोजी निविदेतील Expression of Interest अंतर्गत नमुद केलेल्या अटीस व शर्तीस अनुसरुन मा.आयुक्त यांचे दालनामध्ये सादरीकरण केले. या सादरीकरणावेळी मा.आयुक्त, मा. अति.आयुक्त-१, सह शहर अभियंता (BRTS) तसेच BRTS विभागाचे इतर अधिकारी उपस्थित होते. या दोन्ही संस्थांनी केलेल्या सादरीकरणाचे महापालिका स्तरावरील तज्ञ समितीद्वारे तुलनात्मक छाननी केली. EOI अंतर्गत तांत्रिक तसेच अनुभव व सादरीकरण या बाबींमध्ये प्रसन्न देसाई आर्किटेक्ट ॲण्ड अर्बन डिझाईनर सह मॅप्स ग्लोबल सिव्हिलटेक प्रा. लि. हे सल्लागार / संस्था सरस व पात्र ठरले. त्यांचेकडुन निगडी ते दापोडी भाग-१ व भाग-२ ची कामे करुन घेण्यात यावीत, असे सर्वानुमते अंतिम करण्यात आले. मे.मॅप्स ग्लोबल सिव्हिलटेक प्रा. लि. या दोन्ही भागासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Consultant) म्हणुन काम पाहणार आहेत. तसेच प्रसन्न देसाई आर्किटेक्ट ॲण्ड अर्बन डिझाईनर हे मनपाच्या आर्किटेक्ट व अर्बन डिझाईनचे पॅनेलवर असून या दोन्ही भागांसाठी Urban Designer म्हणुन ते काम पाहणार आहेत. तसे त्यांचे MoU झालेले आहे आणि त्यांना प्रचलित पद्धतीने देयक अदा केले जाणार आहे. सदरच्या EOI अंतर्गत नमुद केलेल्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१८/प्र. क्र.५४/ नवी१६ दि.०४ जुन २०१८ अन्वये मे.मॅप्स ग्लोबल सिव्हिलटेक प्रा. लि. यांना खाली नमुद केलेप्रमाणे सदरच्या दोन्ही प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणे व त्यांना खालील प्रमाणे फी अदा करणे क्रमप्राप्त होणार आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाच्या/ कामाच्या प्रगतीचा टप्पा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात) |
|---|---|---|
| | | इतर सर्व कामांसाठी |
| १ | प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर | ०.५० (डीपीआर०.३३% +प्रमा-०.१७%) |
| २ | प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर | ०.१६ |
| ३ | प्रकल्पाचे २५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.२७ |
| ४ | प्रकल्पाचे ५० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.२७ |
| ५ | प्रकल्पाचे ७५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४० |
| ६ | प्रकल्पाचे १०० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४० |
| | एकुण | २.००% |

निगडी दापोडी रस्त्याच्या भाग १ - डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी ते हॅरिस ब्रिज दापोडी व भाग २ - डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी ते भक्ती शक्ती चौक निगडीसाठी मे.मॅप्स ग्लोबल सिव्हिलटेक प्रा.लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करुन २.००% इतक्या दराने फी अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००६८ विषय क्रमांक – ३६
दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– आरोग्य मुख्य
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ - मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.आमुका/१/कावि/१११/२०२१, दि.२८/०७/२०२१

मा.अति.आयुक्त(१) आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत घनकचरा व्यवस्थापन तसेच कचरा विलगीकरणाचे कामकाजासंबंधी इंदोर महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेल्या मे.बेसिक्स म्युनिसिपल वेस्ट व्हेंचर्स या संस्थेमार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचा-यांकरिता कार्यशाळा आयोजित करण्याकरिता मा.आयुक्त यांनी निर्देश दिलेले आहेत. त्याकरिता हॉटेल फर्न, भोसरी येथे दि.२१/०७/२०२१ रोजी सकाळी ९ वाजता कार्यशाळा आयोजनाचे करण्यात आले. स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत घनकचरा व्यवस्थापन तसेच कचरा विलगीकरणाचे कामकाजासंबंधी दि.२१/०७/२०२१ रोजी हॉटेल फर्न येथे आयोजीत कार्यशाळेस मा. आयुक्त, मा.अति. आयुक्त, आरोग्य वैद्यकिय अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी, आरोग्य निरीक्षक, केपीएमजी, सीटीओ व मे.बेसिक्स म्युनिसिपल वेस्ट व्हेंचर्स यांचे प्रतिनिधी असे एकुण ३० अधिकारी/ कर्मचारी कार्यशाळेकरिता उपस्थित राहीले व त्याकामी होणा-या खर्चाकरिता र.रु.३९,४५०/- इतकी रक्कम आगाऊ स्वरुपात आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे नावे घेणेत आली आहे. सदरचा खर्च हा स्वच्छ भारत अभियान कक्षातील क्षमता बांधणी व प्रशासकीय व कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षातुन खर्ची टाकणेकामी मा.आयुक्त सो यांनी दि.१९/७/२०२१ रोजीचे आदेशान्वये मान्यता दिलेली आहे. सदर प्रमाणे स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत घनकचरा व्यवस्थापन तसेच कचरा विलगीकरणाचे कामकाजासंबंधी आयोजित कार्यशाळेच्या खर्चाकरिता आरोग्य कार्यकारी अधिकारी, पिंचिंमनपा यांचे नावे काढण्यात आलेल्या र.रु.३९,४५०/- (अक्षरी र.रु.एकोणचाळीस हजार चारशे पन्नास फक्त) इतक्या रकमेच्या खर्चाकरिता कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००६९ विषय क्रमांक – ३७
दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– मध्य.सा.भांडार,वैद्यकीय
सुचक – मा.शत्रुघ्न काटे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ - मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/८७१/२०२१, दि.२८/०७/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोविड-१९ चे लसीकरण केंद्र उभारण्याकामी इच्छुक संस्थांकडून, ज्यांना वैदयकीय सेवेअंतर्गत मनुष्यबळ पुरविण्याचा अनुभव आहे. अशा संस्थाना सदर कामकाजाकरीता मनुष्यबळ उपलब्ध करणेकामी ई-निविदा नोटीस क्रमांक-०९/२०२१-२०२२ प्रसिध्द करण्यात आली होती. सदर ई-निविदेकरीता M/s.Emkay Facilities Services Pvt. Ltd., यांचेकडून १ टीमकरीता प्राप्त झालेला लघुत्तम दर र.रु.७५,२२८/- (अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.१८% पेक्षा कमी) स्विकृत करण्यात आलेला असून तातडीची बाब असलेने त्यांना कामाचा आदेश देण्यात आलेला आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोविड-१९ चे लसीकरण केंद्र उभारुन दोन महिनेचे कालावधीकरीता कामकाज करणेकामी १ टीमकरीता ( प्रत्येक लसीकरण केंद्रावर प्रत्येकी १ ए.एन.एम./ जी.एन.एम. डाटा एंट्री ऑपरेटर व मदतनीस (वर्ग-४)) करीता

र.रु.७५,२२८/- प्रमाणे ५० टीमकरीता प्रति महिना र.रु.३७,६१,४००/- प्रमाणे दोन महिन्यांकरीता येणा-या र.रु.७५,२२,८००/- (अक्षरी र.रू.पंच्याहत्तर लाख बावीस हजार आठशे फक्त) चे खर्चास करारनामा करुन व अनामत रक्कम घेणेकामी तसेच सदरचा खर्च मध्यवर्ती भांडार विभागाकडील कोरोना निधी या लेखाशिर्षामधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००७० | विषय क्रमांक – ३८

दिनांक – ०४/०८/२०२१ | विभाग– स्थापत्य ब मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे | अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ - मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/९४६/२०२१, दि.२८/०७/२०२१

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.75/01/2020-21 अन्वये प्रभाग क्र.१८ मधील दर्शन नगरी ते संत गार्डन बिल्डींग पर्यंतचा रस्ता अर्बन स्ट्रीट डिझाईन नुसार विकसीत करणेकामी मे.श्रीगणेश कंन्स्ट्रक्शन नि.र.रू.2,56,31,969/- (अक्षरी र.रु.दोन कोटी छप्पन्न लाख एकतीस हजार नऊशे एकोणसत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.2,54,46,269/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.2,54,46,269/- पेक्षा 22.89% कमी म्हणजेच र.रु.1,96,21,618/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,09,426/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,85,700/- = एकुण र.रु.1,99,16,744/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील याअटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००७१ | विषय क्रमांक – ३९

दिनांक – ०४/०८/२०२१ | विभाग– बी.आर.टी.एस.स्थापत्य

सुचक – मा.शशिकांत कदम | अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/बी.आर.टी.एस/९०५/२०२१, दि.२९/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

स्थापत्य बीआरटीएस विभागामार्फत पार्क स्ट्रीट समोर सबवे बांधणेच्या कामाचा आदेश मे.टी अँड टी इन्फ्रा. प्रा.लि. यांना दि.२८/०२/२०१८ रोजी देण्यात आलेला आहे. त्यानुसार मे.टी अँड टी इन्फ्रा प्रा.लि. यांनी कामास सुरुवात करुन दि.३०/०३/२०२१ रोजी काम पुर्ण केलेले आहे. सदर कामांतर्गत सबवे व सबवेतील पादचारी मार्ग, BRTS बस स्टेशनकडे जाणारा रॅम्प, स्टॅम्प कॉक्रीट, रेलिंग व रस्ता पुर्ववत करणे इ. कामे करणेत आलेले आहे. परंतु सदरकामाचे अंतिम देयक व भाववाढ देयक अदा करणे बाकी आहे. सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात पान क्र.५५० अ.क्र.१७ वर र.रु.१,६५,००,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी पासष्ठ लाख फक्त) इतकी तरतुद उपलब्ध

होती. सन २०२१-२२ मध्ये अंतिम देयक व भाववाढ देयक अदा करणेकरीता पुरेशी तरतुद उपलब्ध नाही. त्यामुळे सदर कामांकरीता तरतुदीत वाढ/घट करणे आवश्यक आहे. त्याचे वर्गीकरण तक्ता खालील प्रमाणे सादर करणेत आला आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०२१-२२ ची मुळ तरतुद | वाढ र.रु. कोटीत | घट र.रु. कोटीत | सन २०२१-२२ चा सुधारित अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सांगवी किवळे रसत्यावर पार्क स्ट्रिट समोर सबवे बांधणे. | ५५४ | १७ | UTF | १०००००० | २०००००० | ० | ३०००००० |
| २ | सांगवी-किवळे रस्त्यावरील ताथवडे पुनावळे चौकापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण करणे. | ५५४ | २६ | UTF | ५००००००० | ० | २०००००० | ४८०००००० |
| | **एकुण** | | | | **५१००००००** | **२००००००** | **२००००००** | **५१००००००** |

तरी सदर कामाच्या तरतुदीत वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००७२ विषय क्रमांक – ४०

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– इ क्षेत्रीय आरोग्य

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ - मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.इक्षेका/आ/४/कावि/३०७/२०२१, दि.२६/०७/२०२१

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग ३,४,५ व ७ मधील ५५ ब्लॉक ४२४ सिटस सार्वजनिक शौचालयाचे व मुता-यांची यांत्रिक पध्दतीने (पाण्याच्या उच्चदाब फवा-याचे सहाय्याने) व मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई व देखभाल दुरुस्ती करणे कामाचा मा.आयुक्त सो. यांचेकडील दि.०२/०१/२०१८ चा मान्य प्रस्ताव करण्यात आला. नि.नो.क्र ४/२०१८-१९ अन्वये निविदा र.रु.३५,८१,९५२/- वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करणेत आली होती. मे.महालक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सह संस्था मर्या यांनी निविदा रकमेच्या ३५% कमी दराने म्हणजेच र.रु.२३,२८,२६९/- दर प्रति सिटस प्रति माहे र.रु.४५८/- स्विकृत करणेत आलेला आहे. मे.महालक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सह संस्था मर्या या संस्थेस देण्यात आलेल्या कामाची मुदत दि.११/१०/२०१८ ते १०/१०/२०१९ अखेर होती. सदर निविदा दिनांक १०/१०/२०१९ रोजी मुदत संपुष्टात येत असलेने निविदा क्र.२/२०१९-२०२० तयार करण्यात आलेली होती. परंतु मा.आरोग्य वैदयकीय यांचेकडील पत्र क्र.आमुका/२/कावि/३५८/२०१९ दि.३०/०८/२०१९ अन्वये निविदामध्ये बदल करणे व ३ वर्षासाठी निविदा काढण्यात यावी असे नमूद करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने वेळेत निविदा तयार होणार नसल्याने व विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागू होणार असल्याने उक्त कामासाठी ३ महिने कालावधी अथवा नविन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सदर कामास मुदतवाढ मिळणेकामी प्रस्ताव सादर करुन दि.०९/०९/२०१९ रोजी मा.आयुक्त सो यांनी दि.९/१/२०२० पर्यत मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच मे.महालक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सह संस्था मर्या. यांची दि.१०/०१/२०२० अखेर होणा-या खर्चावर मान्यता संपुष्टात आलेली आहे.

त्यामुळे ठेकेदार यांना दि.११/०१/२०२० ते १०/०९/२०२० अखेर ९ महिने कालावधी करीता अथवा नविन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत येणा-या र.रु.१५,७५,०००/- अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास दिलेली कार्योत्तर मान्यता संपुष्टात आलेली आहे. सदर संस्थेचे कामकाज दि.१०/०२/२०२१ पासून नवीन २ संस्थाना देणेत आलेले आहे. त्यामुळे दि.११/०९/२०२० ते ०९/०२/२०२१ अखेर ५ महिने कालावधीत केलेल्या कामाचे र.रु.९,००,०००/- (अक्षरी र.रू.नऊ लाख फक्त) बिल अदा करणेकामी अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००७३ विषय क्रमांक – ४१

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे

संदर्भ - मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/८३४/२०२१, दि.२८/०७/२०२१

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.4/4/2021-22 अन्वये प्रभाग क्र.8 येथील डिस्ट्रीक सेटर परिसरातील फुटपाथ कलर पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे.एस.एस.एन्टरप्रायझेस नि.र.रू.30,67,910/- (अक्षरी र.रु.तीस लाख सदुसष्ठ हजार नऊशे दहा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.30,47,460/- (अक्षरी र.रु.तीस लाख सत्तेचाळीस हजार चारशे साठ फक्त) वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.30,47,460/- पेक्षा 34.07% कमी म्हणजेच र.रु.20,09,190/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.29,116/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.20,450/- = एकुण र.रु.20,58,756/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००७४ विषय क्रमांक – ४२

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– क क्षेत्रीय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र क्र.कक्षे/लेखा/नि.क/१५/कावि/५८२/२०२१,दि.२९/०७/२०२१

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रीस कार्यालय, विद्युत विभागाकडील प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ(१ ते ११) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्तीप्रमाणे संबधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – १००७५ विषय क्रमांक – ४३

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– नागरवस्ती विकास योजना

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/२/कावि/५५/२०२१, दि.२८/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिलांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. परंतु माहे मार्च २०२० पासून कोरोना विषाणूचा प्रसार मोठया प्रमाणात वाढल्याने अनेक घरांमधील कर्त्या पुरुषांचे कोरोना विषाणू संसर्गाने निधन झाले आहे. घरातला कर्ता व्यक्ती निर्वतल्यानंतर त्यांचेवर अवलंबून असणा-या कुटुंबातील इतर सदस्याची आर्थिक परीस्थिती बिकट झाली आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील विधवा महिला आत्मनिर्भर होण्यासाठी त्यांची आर्थिक गरज आणि कौटुंबिक अडीअडचणी लक्षात घेता विधवा झालेल्या महिलांना नागरवस्ती विकास योजना विभागाकडील विधवा अर्थसहाय्य योजनेतून र.रु.१०,०००/- ऐवजी र.रु.२५,०००/- (अक्षरी र.रू.पंचवीस हजार फक्त) अर्थसहाय्य देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००७६ विषय क्रमांक – ४४

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– स्थापत्य क मुख्यालय

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/८२९/२०२१, दि.२६/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.8/3/2021-22 अन्वये पिंपरी नेहरुनगर मुख्य रस्त्यावरील आरक्षण क्र.६६ मध्ये पी.एम.पी.एम.एल.साठी बस डेपो बांधणे व अनुषंगिक कामे करणेकामी मे.टेक्सन बिल्डर्स नि.र.रू.8,60,16,341/- (अक्षरी र.रु.आठ कोटी साठ लाख सोळा हजार तीनशे एक्केचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.8,59,15,590/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.8,59,15,590/- पेक्षा 21.83% कमी म्हणजेच र.रु.6,71,60,217/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.3,12,052/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,00,750/- = एकुण र.रु.6,75,73,019 /- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००७७ विषय क्रमांक – ४५

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– क्रिडा

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ - मा.प्रविण भालेकर मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.२९ दि.२३/०७/२०२१ अन्वये ग्रामसेवक, ग्रामपंचायत, तुळापुर यांना श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान दिन (फाल्गुन अमावास्या) समाधी ठिकाणी, तुळापुर येथे मंडप व्यवस्था, लाईट व्यवस्था, पिण्याचे पाणी, हारफुले इ.करिता अनुदान, आर्थिक सहाय्य अदा करणेकामी, " ग्रामपंचायत, तुळापुर यांना श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान दिन (फाल्गुन अमावास्या) कार्यक्रमासाठी द्यावयाचे अनुदान" असे नव्याने लेखाशिर्ष करणेस व या लेखाशिर्षावर सन २०२१-२२ पासून दरवर्षी र.रु.३,००,०००/- (अक्षरी र.रू.तीन लाख फक्त) इतकी तरतूद करणे या करिता उपयोगिता प्रमाणपत्र/विनियोग दाखला, खर्चाच्या पावत्या सादर करणे व दरवर्षी मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००७८ विषय क्रमांक – ४६

दिनांक – ०४/०८/२०२१

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ - मा.प्रविण भालेकर मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.३५ दि.२३/०७/२०२१ अन्वये कु.स्नेहा कासले या अर्बन हेल्थ या नावाने जिम चालवित आहेत. त्यांनी महिलांकरिता झुंबा क्लासेस व अरोबिक साठी से.क्र.२६ येथील अरोबिक सेंटर, जिम्नॅशियम हॉलची मागणी केली होती. सदर मागणीचा विचार करुन महानगरपालिकेने क्रिडा समितीत ठराव क्र.८९ विषय क्र.१० दि.१३/०३/२०२० रोजी त्यांना से.क्र.२६ येथील अरोबिक सेंटर, जिम्नॅशियम हॉल देण्याचा विषय झाला होता. पण कु.स्नेहा कासले यांनी महानगरपालिकेचा भाडे करार केलेला नाही, दुरध्वनी, मेलवर तसेच तोंडी कळवूनही काहीच प्रतिसाद नसल्याने म.न.पा.चे नुकसान होत आहे. त्यामुळे स्काय चाईल्ड फौंडेशन ही संस्था २०१६ पासून दिव्यांग आणि विशेष मुलांसाठी कृती आणि रिहॅबिलिटेशन सेंटर चालवित आहे. तरी सदर संस्थेत दिव्यांग मुलांना विविध उपक्रम थेरिपिद्वारे मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न केले जातात. तरी सदरचा हॉल स्काय चाईल्ड फौंडेशन या संस्थेला देण्यात यावा. सदरची स्काय चाईल्ड फौंडेशन ही संस्था महानगरपालिकेने ठरविलेल्या भाडे दरात हॉल भाड्याने घेण्यास तयार असल्याने सदर संस्थेस हॉल देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००७९ विषय क्रमांक – ४७

दिनांक – ०४/०८/२०२१

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ - मा.प्रविण भालेकर मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.३६ दि.२३/०७/२०२१ अन्वये प्रभाग क्रमांक ११ येथील म्हेत्रेवस्ती ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले प्राथमिक शाळेतील व्यायामशाळा म्हेत्रेवस्ती चिखली हि वीर अभिमन्यू फ्रेंड सर्कल साने चौक चिखली या संस्थेस दरमहा र.रू.२०००/- (अक्षरी र.रू.दोन हजार फक्त) म.न.पा कडून सेवाशुल्क देऊन ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००८० विषय क्रमांक – ४८

दिनांक – ०४/०८/२०२१

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ - मा.प्रविण भालेकर मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.३७ दि.२३/०७/२०२१ अन्वये प्रभाग क्र २६ वाकड पिंपळे निलख येथे नव्याने कार्यान्वीत झालेली व्यायामशाळा कावेरीनगर ही कावेरीनगर युवक मित्र मंडळ या संस्थेस ११ महिने कराराने सेवाशुल्क र.रू.२०००/-(अक्षरी र.रू.दोन हजार फक्त) म.न.पा कडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००८१ विषय क्रमांक – ४९

दिनांक – ०४/०८/२०२१

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ - मा.प्रविण भालेकर मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव –

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.३८ दि.२३/०७/२०२१ अन्वये प्रभाग क्र.६ सदगुरूनगर भोसरी येथील मनपाची व्यायामशाळा हि श्री.ज्योतिबा स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था राधाकृष्णनगर स.न.१९८ जुन्या पोस्ट ऑफीस समोर चक्रपाणी रोड, भोसरी, पुणे ३९ या संस्थेस ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर र.रू.२०००/- (अक्षरी र.रू.दोन हजार फक्त) महापालिकेकडून देवून चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १००८२ विषय क्रमांक – ५०
दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– स्थापत्य ब मुख्यालय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ - मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/ब-मुख्य/९४८/२०२१, दि.३०/०७/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.20/01/2021-22 अन्वये प्रभाग क्र.१७ मधील बिजलीनगर अंडरपासची अनुषंगिक कामे करणेकामी (उर्वरित कामे करणे) मे.कृष्णाई इन्फ्रास्ट्रक्चर प्रा लि नि.र.रू.4,11,29,212/- (अक्षरी र.रु.चार कोटी अकरा लाख एकोणत्तीस हजार दोनशे बारा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.4,10,94,212/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.4,10,94,212/- पेक्षा 4.21% कमी म्हणजेच र.रु.3,93,64,146/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.2,31,099/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.35,000/- = एकुण र.रु.3,96,30,245/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००८३ विषय क्रमांक – ५१
दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ - मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/२७६/२०२१, दि.०३/०८/२०२१

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा(COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center वInstitutional Quarantine Center येथील रुग्ण तसेचनियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टाउपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार दि.18/04/2021 अखेर र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति व दि.19/04/2021 पासून रुपये 230/- प्रति दिन प्रति व्यक्ती याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन विषयाच्या सविस्तर तपशिलामध्ये नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रू.15,55,720/- (अक्षरी र.रू.

पंधरा लाख पंचावण्ण हजार सातशे वीस फक्त) चे खर्चास मान्यता व पुरवठादार मे. जोशी बंधू केटरर्स यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००८४ विषय क्रमांक – ५२

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ - मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.पअक/कावि/१/४९०/२०२१, दि.२९/०७/२०२१

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पर्यावरण विभागाकडील नि.नो.क्र.07/01/2020-2021 अन्वये मनपाच्या क्षेत्रात पर्यावरण जनजागृती कामी आकर्षक वॉल पेटींग, बोर्ड, फ्लेक्स बसविणेकामी (माझी वसुंधरा अभियान अंतर्गत) मे.ओम एंन्टरप्रायजेस नि.र.रू.42,01,628/- (अक्षरी र.रु.बेचाळीस लाख एक हजार सहाशे अठठावीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.42,01,628/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.42,01,628/- पेक्षा 5.20% कमी म्हणजेच र.रु.39,83,143/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.39,83,143/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – १००८५ विषय क्रमांक – ५३

दिनांक – ०४/०८/२०२१ विभाग– वाहन दुरूस्ती कार्यशाळा

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.काशा/३/कावि/३४८/२०२१, दि.३०/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोरोना विषाणू (कोविड -१९) या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव कमी करणेकरीता संक्रमित रूग्ण शोधून कोविड रूग्णालय/कोविड केअर सेंटर इ.ठिकाणी भरती करणे या कामाकरीता क्षेत्रीय कार्यालयनिहाय फिल्ड सर्व्हिलन्स् टीम (FST) तयार करण्यात आली.मा.आयुक्त यांनी या टिमकरीता लागणारी आवश्यक सुमो तत्सम प्रकाराची वाहने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय पिंपरी चिंचवड (आर.टी.ओ.) यांचेमार्फत उपलब्ध करण्यात यावीत व त्यांचेकडील मंजूर दराने झालेल्या खर्चाचे बिल मा.स्थायी समिती सभेची कार्योत्तर मान्यता घेवून अदा करणेस मान्यता घेणेत आली आहे. या मंजूर प्रस्तावान्वये वैद्यकिय विभागाच्या मागणीप्रमाणे त्या-त्या वेळेस वाहने अधिगृहीत करण्यात आलेली असून झालेल्या खर्चास मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेवून बीले अदायगी करण्यात आलेली आहेत. पिं.चिं. मनपा क्षेत्रात माहे मे २०२१ मध्ये कोरोना या विषाणूचा प्रसार मोठ्या प्रमाणात

